# एकलव्य आर्थिक सहाय्य योजना

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | एकलव्य आर्थिक सहाय्य योजना |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 07.02.1996 |
| ३ | योजनेचे स्वरूप | राज्य शासनाकडून होतकरु व गरिब विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी एकलव्य आर्थक सहाय्य योजना सुरु करण्यात आलेली आहे. |
| ४ | योजनेचा उद्देश | होतकरु व गरिब विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी सहाय्य करणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. कला , वाणिज्य , विधी व शिक्षणशास्त्र शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान 60 टक्के व विज्ञान शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान 70 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>२. विद्यार्थांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 75,000/- किंवा त्यापेक्षा कमी असावे.<br>३. विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>४. संबंधित लाभार्थी विद्यार्थी कुठेही पुर्णवेळ नोकरी करणारा नसावा.<br>५. शिष्यवृत्ती घेणारा विद्यार्थी शुल्क माफीच्या सवलतीस पात्र राहील.<br>६. अर्धवेळ अभ्यासक्रमाचा विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी पात्र राहणार नाही.<br>७. बी.एड. प्रशिक्षण अभ्यासक्रम तसेच एम.फील व पी.एच.डी व तत्सम अभ्यासक्रमासाठी ही योजना लागू नाही.<br>८. सदर शिष्यवृत्ती मंजुर झाल्यास इतर केंद्र / राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येणार नाही .<br>९. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत<br>१०. नियमित उपस्थिती 75 टक्के असणे आवश्यक आहे.<br>११. नूतनीकरनासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षी किमान 50 टक्के गुण असणे आवश्यक आहे.<br>१२. नूतनीकरनासाठी विद्यार्थाने मागील वर्षीच्या Application ID चा उपयोग करावा. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | १. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>२. शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमापणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>३. मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे .<br>४. नूतनीकरणासाठी उपस्थिती प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | सदर शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थांना प्रतिवर्ष रु 5000/- प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |